लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज साहित्य चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि सांगलीतील मित्र सामाजिक प्रतिष्ठानतर्फे कवी प्रा. चारुदत्त भागवत यांची जयंती साजरी करण्यात येणार आहे. मराठी विभागात गुरुवारी (दि. २८) सकाळी ११ वाजता चारुदत्त भागवत : कवी आणि कविता या विषयावर साहित्य चर्चा आयोजित केली आहे. त्यामध्ये कवी भागवत यांच्या कविता संग्रहातील काही कवितांचे वाचन विभागातील विद्यार्थी करतील. अध्यक्षस्थानी समीक्षक प्रा. अविनाश सप्रे असतील. या चर्चेत कणाद भागवत (कमांडर भारतीय नौदल), डॉ. राहुल पुंगलिया (पुणे), प्रा. शरद नावरे (कोल्हापूर) सहभागी होणार आहेत, अशी माहिती मराठी विभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

28 APR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील सैफ सेंटरतर्फे आज कार्यशाळा

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न सोडवून अभिवादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज कृतज्ञता पर्व अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटर आणि विद्यापीठ उद्योग संवाद केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन आज गुरुवार (दि. २८) सकाळी १० वाजता होणार आहे. विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात ही कार्यशाळा होणार आहे. या कार्यशाळेच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रातील अडचणी समजून घेत विद्यापीठातील प्राध्यापक त्यावर शास्त्रीय पद्धतीने उपाय सूचवणार आहेत, तरी जास्तीत जास्त औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातील सैफ सेंटरप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले आहे.



कोल्हापूर परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी विद्यापीठातर्फे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील केंद्र सरकारच्या 'विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या' निधीतून कार्यरत असणाऱ्या सैफ सेंटरमधील उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा औद्योगिक क्षेत्रापर्यंत पोहोचाव्या हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश आहे. या कार्यशाळेत अनेक औद्योगिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळच्या सत्रात औद्योगिक क्षेत्रासाठी मान्यवरांची व्याख्याने होणार आहेत. दुपारच्या सत्रात उच्च वैज्ञानिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा उपलब्ध असणाऱ्या सैफ सेंटरला भेट देऊन या सुविधांचा उपयोग औद्योगिक क्षेत्राला कसा होऊ शकेल याविषयी माहिती दिली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठ आणि औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांच्या चर्चासत्राचे आयोजन केले आहे. विद्यापीठ आणि औद्योगिक क्षेत्रातील अंतर कमी करण्यासाठी या कार्यशाळेचा उपयोग होईल. या कार्यशाळेत कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज (केसीसीआय), शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (स्मॅक), भारतीय उद्योग परिसंघ (सीआयआय), जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूर (डीआयसी), गोशिमा, मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन ऑफ कागल आणि हातकणंगले, द इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमेन (आयआयएफ) आदी विविध संस्थांचे अध्यक्ष उपस्थित राहणार आहेत.

### कार्यशाळेचा औद्योगिक क्षेत्राला होणार लाभ

शिवाजी विद्यापीठातील सैफ सेंटर्तर्फे औद्योगिक क्षेत्रातील प्रश्न समजून घेऊन, विद्यापीठातील विविध अधिविभागातील प्राध्यापकांच्या माध्यमातून शास्त्रीय पद्धतीने उपाय योजना सुचवल्या जाणार आहेत. याचा औद्योगिक क्षेत्राला उपयोग होणार आहे. यातून विद्यापीठ व औद्योगिक क्षेत्र यांच्यातील दुरावा कमी होणार आहे. तसेच ६ मे रोजी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती शताब्धी वर्षानिमित्त त्यांना अभिवादन केले जाणार आहे.

– डॉ. आर. जी. सोनकवडे (शिवाजी विद्यापीठ, सैफ सेंटरप्रमुख)

पुढारी

# शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी सांगता समारंभ उद्या

कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे २०१८-१९ जन्मशताब्दी वर्ष होते. हे संस्थेच्या ४०७ संस्कार केंद्रांमध्ये मोठ्या उत्साहात साजरे झाले. सांगता समारंभ शुक्रवारी (दि. २९) सकाळी साडेदहा वा. विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी पत्रकार बैठकीत दिली.

प्रमुख पाहुणे अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज, शाहू महाराज, संस्थेचे पेट्रन खासदार संभाजीराजे, संस्थेचे अध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर.व्ही. शेजवळ, सहसचिव (अर्थ ) एस.एम. गवळी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावर आधारित शाहीर आझाद नायकवडी यांचा पोवाडा, स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, प्रा. डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित 'व्यक्तित्व एवं कार्य' आणि प्रा. डॉ. मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. यावेळी शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, चंद्रशेखर दौडमणी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

28 APR 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रशिया-युक्रेन युद्धाचे दूरगामी परिणाम

## डॉ. अशोक चौसाळकर



कोल्हापूर : ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना केंद्र संचालक डॉ. डी. के. मोरे आदी.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

युरोपात सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध एकविसाव्या शतकातील सर्वात मोठे युद्ध आहे. या युद्धाचे भारतासह जगभरावर दूरगामी परिणाम होतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत 'आजादी का अमृतमहोत्सव' आणि शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त राज्यशास्त्र विषयांतर्गत आयोजित 'भारतातील बदलते राजकीय अंतरंग' या ऑनलाईन व्याख्यानमालेत 'रशिया-युक्रेन युद्ध-भारतावरील परिणाम' या विषयावर बोलत होते. डॉ. चौसाळकर म्हणाले, या युद्धाने जागतिक राजकारणात मोठे बदल झालेले आहेत. कोरोनानंतरच्या या युद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. केंद्र संचालक डॉ. डी. के. मोरे अध्यक्षस्थानी होते, तर उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे, चंद्रकांत कोतमिरे उपस्थित होते. डॉ. एस. डी. भोसले यांनी प्रास्ताविक, डॉ. एस. एल. गायकवाड यांनी परिचय, डॉ. पी. एन. देवळी यांनी सूत्रसंचालन, तर डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

28 APR 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पाच राज्यांच्या निकालाने राजकारणाचा पट बदलला : डॉ. प्रकाश पवार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या उत्तर प्रदेश, उत्तराखंड, मणिपूर, गोवा आणि पंजाब या पाच राज्यांच्या निवडणुकांच्या निकालाने संपूर्ण भारतीय राजकारणाचा पट बदललेला आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्र अधिविभागातील प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत आझादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठ हीरकमहोत्सवानिमित्ताने दि. २५ ते



२९ एप्रिल या कालावधीत राज्यशास्त्र विषयांतर्गत आयोजित 'भारतातील बदलते राजकीय अंतरंग' या विशेष ऑनलाईन व्याख्यानमालेअंतर्गत पाच राज्यांतील निवडणुकीचा अन्वयार्थ या विषयावर दुसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते. यावेळी उपकुलसचिव डॉ. एन. जे बनसोडे, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

डॉ. पवार म्हणाले, हा निकाल चित्तवेधक व चिकित्सा निर्माण करणारा आहे. भारतामध्ये १९५२ पासून निवडणुका सुरू झाल्या आहेत. १९५२ ते १९७० पर्यंतच्या निवडणुकांबद्दल अमेरिकेला प्रश्न पडलेला होता की, भारताचे राजकारण हे केंद्राकडून घडते की राज्याकडून. विनर आणि इक्बाल नायर यांनी केलेल्या अभ्यासानुसार 'स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया' या ग्रंथात म्हटले आहे की, भारताचे राजकारण हे राज्यातून घडते. संपूर्ण राजकारणाचा पट हा जिल्हा, राज्य आणि देश पातळीवर घडत असतो. केंद्राच्या राजकारणाचा परिणाम राज्याच्या राजकारणावर होतो आणि राज्याच्या राजकारणाचा परिणाम केंद्राच्या राजकारणावर पडत असतो. मतांची टक्केवारी आणि मिळणाऱ्या जागा यावर राजकीय पक्षांचे वर्चस्व ठरत असते.

प्रास्ताविक प्रा. पी. एस. कांबळे, सूत्रसंचालन प्रा. डॉ. एस. डी. भोसले यांनी केले. आभार डी. के. कमलाकर यांनी मानले.

तरुण भारत



कोल्हापूर : इन्फोसिस बीपीएम ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यूहमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या गोखले कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमवेत प्रा.जयकुमार देसाई,प्रा. डॉ. मंजिरी मोरे, प्रा. पी. बी. झावरे, प्रा. एस. एच. पिसाळ, सुनिल देसाई आदी

# गोखले कॉलेज कॅम्पसमधून २३० विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर :गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज आणि इन्फोसिस बीपीएन बेंगलोर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यू पार पडले. या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये पश्चिम महाराष्ट्रातून पदवीच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या २३० विद्यार्थ्यांची इन्फोसिस पुणे येथे निवड करण्यात आली. ऑनलाईन कॅम्पस इंटरव्ह्यूहसाठी १७५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. या इंटरव्ह्यूह कार्यक्रमात लेखी परीक्षा, कौशल्यावर आधारित मुलाखतीच्या दोन फेऱ्या झाल्या. यातून २३० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. कोल्हापूर, बीड, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली जिल्ह्यातील विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा.जयकुमार देसाई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निवड झालेल्या २३० पैकी २० विद्यार्थी गोखले कॉलेजचे आहेत. या विद्यार्थ्यांना जयकुमार देसाई, पेट्रन कौन्सिल मेंबर दौलत देसाई, प्रशासन अधिकारी डॉ.मंजिरी मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पी. के पाटील, उप प्राचार्य एस. एच. पिसाळ, पर्यवेक्षक प्रा. एस. एन.मोरे, प्रा. पी. बी. झावरे, प्लेसमेंट सेलचे चेअरमन प्रा. सुहास घाटगे, प्रा. डी. व्ही. आवळे उपस्थित होते.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या सचिवपदी संभाजी कांबळे

**कोलोली :** माळवाडी / कोतोली ता.पन्हाळा येथील श्रीपतराव चौगुले महाविध्यालयातील समाजशास्त्र विभागाचे प्राध्यापक संभाजी कांबळे यांची शिवाजी विध्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या सचिव पदी निवड करण्यात आली आहे अशी माहिती संस्थेचे सचिव शिवाजी पाटील यानी दिली . समाजशास्त्राचे तेरावे अधिवेशन उंब्रज येथे नुकतेच पार पडले .त्यामध्ये त्यांची निवड करण्यात आली आहे .श्रीपतराव चौगूले महाविध्यालयात ते बावीस वर्षे अध्यापनाचे कार्य करत आहेत. त्यांना संस्थेचे अध्यक्ष व जि.प. चे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती डॉ.के.एस.चौगुले ,संचालक मंडळ,प्राचार्य,प्राध्यापक.आदींचे मार्गदर्शन लाभले आहे.

